**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**

**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१**

---

**पत्र /ई-मेलव्दारे**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/MSCIT/प्र.क्रं.१२१(१८-१९)/ 2960

नागपूर ४४०००१, दिनांक: 18-12-2018

विषय:- महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, २०१८

संदर्भ:-१) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४६६/कार्या-१२, दिनांक २८/५/२०१८

२) या कार्यालयाचे पत्र कक्ष-७(१)/आस्था-१/प्र.क्र.१७६(१७-१८)/६५४, दिनांक ३०/१०/२०१८

३) महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील पत्र क्र. संकीर्ण १०/०६/प्र.क्र.४५१/फ-४, दिनांक ४/४/२००७

४) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.६२/४८/०६-०७, दिनांक १२/४/२००७

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ अधिसूचित करण्यात आलेले आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्र. मातसं/नस्ती०४/२२४/३९, दिनांक २६/५/२००४ मधील तरतुदीनुसार, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण १०/०६/प्र.क्र.४५१/फ-४, दिनांक ४/४/२००७ अन्वये वनरक्षक, वनपाल, वाहन चालक, काळजी वाहक, महावत व हत्यारी पोलिस या संवर्गातील कर्मचाऱ्यांना MS-CIT ची परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट शिथिल करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, या कार्यालयाचे संदर्भिय पत्र दिनांक १२/४/२००७ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व यांना सूचित करण्यात आले होते.

२. वन विभागातील क्षेत्र सर्वेक्षक गट-ब (अराजपत्रित) मुख्य लेखापाल, लेखापाल, सर्वेक्षक, वनपाल, लिपीक-नि-टंकलेखक व वन रक्षक गट-क पदांचे सेवाप्रवेश नियम २०११ अन्वये पदावर नेमणूक झालेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील अशी तरतूद केली आहे. वनरक्षक, वनपालांचे उपरोक्त नमूद सेवाप्रवेश नियम दिनांक ३०/६/२०११ रोजी अंमलात आल्यामुळे त्या तारखेपासून महसूल व वन विभाग पत्र क्र. संकीर्ण १०/०६/प्र.क्र.४५१ /फ-४, दिनांक ४/४/२००७ व या कार्यालयाचे पत्र क्र. क्र.कक्ष-१०(२)/आस्था /एक/प्र.क्र.६२/४८/०६-०७ दिनांक १२/४/२००७ हे निरस्त ठरलेले आहे. त्यामुळे याबाबत सुचना देण्यात येते की, उपरोक्त नियम वनरक्षक व वनपाल यांना लागू असल्याने त्याबाबत वरील तरतुदींचा पालन करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

३. संदर्भिय सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक २८/५/२०१८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मध्ये सुधारणा करण्यात आले आहे. सदर सुधारणेनुसार विहित कालावधीत प्रमाणपत्र सादर न

केल्यास, अशा व्यक्तीची वेतनवाढ, असा विहित कालावधी संपल्यानंतर ते प्रमाणपत्र सादर करेपर्यंत किंवा नियम ५ खाली प्रमाणपत्र सादर करण्यास सूट मिळेपर्यंत, रोखून धरली जाईल, आणि दरम्यानच्या कालावधीत त्यांचा पुढील पदोन्नतीसाठी विचार करण्यात येणार नाही आणि परिवीक्षाधीन अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याचे समजण्यात येणार नाही. तसेच वयाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. वाहनचालक म्हणून नियुक्ती झालेल्या व्यक्तीस प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट आहे. याबाबत या कार्यालयाचे संदर्भित पत्र दिनांक ३०/१०/२०१८ अन्वये सर्व संबंधितांना अधिसूचना २०१८ मध्ये दिलेल्या तरतुदी पालन करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर सूचना आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या निदर्शनात आणून द्यावयात व सदर सूचनाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(यु.के.अग्रवाल)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वनबल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा.पुणे
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, म.रा.जैवविविधता मंडळ, नागपूर
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर/पश्चिम मुंबई
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), पुणे
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर
९) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
१०) क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व)
११) मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), नागपूर
१२) मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन), नागपूर
१३) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
१४) मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणि संग्रहालय प्राधिकरण, नागपूर
१५) महासंचालक, कुंडल प्रशासन विकास व व्यवस्थापन अकादमी, कुंडल
१६) वन संरक्षक (वन्यजीव), नाशिक / पुणे
१७) वन संरक्षक (संशोधन), पुणे
१८) वन संरक्षक, सामाजिक वनीकरण, सर्व

प्रत:- सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.